Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – II March - April 2025

# उच्च प्राथमिक स्तरातील विद्यार्थांसाठी व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रमाची निर्मिती आणि परिणामकारकतेचा अभ्यास

संशोधकाचे नाव
श्री. सुनिल नवनाथ दिघे
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

मार्गदर्शकाचे नाव
डॉ. भागवत भड
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

**सारांश :–**

***आपणास दैनंदिन जीवनात अनेक व्यक्ती भेटत असतात. प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव गुणधर्म हा वेगवेगळा असतो. प्रत्येक व्यक्ती तिच्यात असणाऱ्या वेगळेपणामुळे आपणाला लक्षात राहत असते. परंतु वेगळेपणा वा विशेषता या गोष्टींमध्ये मानसशास्त्रज्ञांना रुची नाही. कारण वृक्ष व दगड यांमध्ये देखील वेगळेपणा आढळतो. यासाठी मानसशास्त्रज्ञ वेगळेपणा व विशेषता यांपेक्षा मानसशास्त्रीय व्यक्तिमत्वाचा विचार करतात. यामध्ये व्यक्तीच्या विचार करण्याच्या सवयी ,विचार प्रकटनवृत्ती ,विशेष लक्षणे अभिरुची आणि स्वतः विषयीचे तत्वज्ञान यांचा समावेश करतात. व्यक्तीचे समग्र मानसशास्त्रीय व्यक्तिमत्व सामान्यतः व्यक्तिमत्व या संज्ञेने संबोधले जाते आणि बहुतेक मानसशास्त्रज्ञांना या संज्ञेविषयी आकर्षण निर्माण झाले आहे. दैनंदिन जीवनात 'व्यक्तिमत्व' हा शब्द आपण स्थूलमानाने वापरतो . आपणांस व्यक्तिमत्वाच्या विविध अंगाचे दर्शन `अमुक व्यक्ती महाबिलंदर आहे', `बालगंधर्व म्हणजे सुरेख सुरेल व्यक्तिमत्व 'अशा प्रकारची विधाने घडवितात. या विधानांतून प्रामुख्याने दुसऱ्यावर पडलेली छाप महत्वाची असते. व्यक्तिमत्वाचा संकुचित अर्थाने वापर या विधानांतून होतो हे लक्षात येते. व्यक्तिमत्व ही संकल्पना मानसशास्त्रज्ञ व्यक्तिभेदाच्या संदर्भात विचारात घेतात परंतु त्याबाबत त्यांच्यातही मतैक्य आढळते.'व्यक्तीमत्व' म्हणजे सर्वसामान्यपणे अनेक प्रतिसादाची 'गोळा बेरीज' असे म्हणतात. तर काहींच्या मते व्यक्तिमत्व म्हणजे जैविक मनोवृती व प्रकृती, उर्मी, अभिलाषा सहजवृत्ती आणि संपादित मनोवृत्ती व चिंतावृत्तीयांचा एकूण समुच्चय होय. मुलांच्या आवडी निवडीप्रमाणे मुलांना वागू द्यावे. आपली आवड मुलांच्यावर लादता कामा नये. मोकळ्या वातावरणात मुलांना खेळू बागडू द्यावे जेणेकरून त्या वातावरणात त्यांच्यातील असणाऱ्या सुप्त गुणांचा विकास होईल व स्वतःचा मार्ग स्वतः शोधण्यास मुलांना फक्त मदत करावयाची आहे. मुलांना फक्त प्रेम सहृदयता आणि संरक्षण व मार्गदर्शनाची गरज आहे. शिक्षणातून विद्यार्थी केवळ संपन्न व्हावा एवढीच अपेक्षा नाही तर त्याचा सर्वांगीण विकास होणे गरजेचे आहे.ज्या शाळेत संशोधक अध्यापनाचे काम करतात त्याच शाळेतील विद्यार्थ्यांमधील व्यक्तिमत्व विकासाच्या कमतरता निदर्शनास आल्या.या उद्देशाने संशोधकाने प्रस्तुत समस्या हाती घेतली होती . जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खांजापूर ता.संगमनेर जि.अहिल्यानगर या शाळेतील उच्च प्राथमिक स्तरातील विद्यार्थांसाठी व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रमाची निर्मिती आणि परिणामकारकतेचा अभ्यास करण्यासाठी***

***प्रस्तुत संशोधन अहवाल तयार करण्यात आला .***

*Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's* licensed Based on a work at *http://www.goeiirj.com*

**महत्वाचे शब्द :–** 1. उच्च प्राथमिक स्तर 2. विद्यार्थी 3. व्यक्तिमत्व विकास

**संशोधन लेखाचा मुख्य भाग :-**

उत्तम जीवन जगता यावे म्हणून प्राचीन शिक्षणातून वैयाक्तिक,सामाजिक ,राष्ट्रीय व अध्यापिक स्तरावर विकास केला जात होता. शिक्षण हे जीवनात परिवर्तन घडवून आणण्याचे महत्वाचे साधन होते. प्राचीन भारतीय शिक्षणाशी आजच्या शिक्षणाची तुलना केली असता आजचे आपले शिक्षण पूर्ण मानव निर्माण करण्यास असफल होत आहे. आज आपल्याला आधुनिक जगातील पूर्ण मानव हवा आहे प्रचलित शिक्षण दुर्दैवाने हे घटक रुजविण्यात यशस्वी होत नाही. व्यक्तिमत्वाच्या एकात्म विकासासाठी आपल्या शिक्षण पद्धतीला विविध मूल्यांच्या प्रणालीची चौकट हवी आहे.

व्यक्तिमत्व विकास म्हणजे व्यक्तीच्या मानसिक , सामाजिक आणि भावनिक क्षमतांचा विकास .यामध्ये आत्मविश्वास , संवाद , कौशल्ये , निर्णय घेण्याची क्षमता आणि इतर व्यक्तींसोबत संबंध निर्माण करण्याची कला यांचा समावेश होतो.विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकास हे शालेय , सामाजिक आणि मानसिक असे विविध अंगे आहेत. व्यक्तिमत्व विकासासाठी विविध तंत्रे आणि साधने उपलब्ध आहेत जसे की वाचन ,परिपाठ ,सांस्कृतिक कार्यक्रम , क्रिडा स्पर्धा, कार्यशाळा आणि व्यक्तिमत्व विकासाचे कोर्स .हे सर्व व्यक्तीला त्यांच्या उद्दिष्टांपर्यंत पोहोचण्यास मदत करतात आणि त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवतात.

**संशोधन समस्येचा ऐतिहासिक आढावा:-**

उद्याचा भारत देश हा आज असणाऱ्या विद्यार्थ्यांमधुन घडणार आहे. जर देशाचे नाव जगात मोठे करायचे असेल तर प्रभावी व्यक्तिमत्व असणारी माणसे घडणे ही काळाची गरज आहे आणि यासाठी शालेय जीवनात त्यावर राजहंसाप्रमाणे संस्कार होणे गरजेचे आहेत कारण त्यांच्यावर घडणाऱ्या संस्काराचा परिणामी समाजावर ,कुटुंबावर व परिसरात सुध्दा त्याचा प्रभाव पडत असतोच म्हणून जे जे चांगले आहे ते ते करणे आवश्यक आहे.

बालवयात योग्य संस्कारांचा बालमनावर उपयोग होणे अत्यंत गरजेचे आहे. प्रभावी व्यक्तीमत्वासाठी ही बाब आवश्यक आहे. हेच विद्यार्थी उद्याचे भावी नागरिक असतात व त्यांना उद्याचा देश चालवावयाचा असतो. बालवयात मनावर कोरले गेलेले संस्कार हे आयुष्यभर त्यांच्या वागण्या बोलण्यातून आपल्याला दिसत असतात . प्रत्यक्षात आपल्याला कृतीतून मोठेपणी जे दिसेल, जे चांगले शाश्वत माणुसकीला जपणारे फुलविणारे आहे ते मुलांना याच वयात परिचित होणे आवश्यक आहे तरच उद्याचा भारत प्रगतिशील विकसित व सुजल होईल.

सन २०१० पासून सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पध्दती ही नवीन मूल्यमापन पध्दती सर्वत्र सुरु आहे. खरचं या पध्दतीमुळे विद्यार्थ्याचा सर्वांगिण विकास होतो. पण याबद्दल पालकातून गैरसमज आहेत. परीक्षा पध्दती बंद झाली ,आमच्या मुलांचे नुकसान झाले इत्यादी, पण तसे नाही उलट तुमच्या मुलांचा सर्वांगाने विकास होत आहे. ते खेळात चांगले आहेत असे म्हटले तर पालक म्हणतात,ते राहू दे,त्याचा अभ्यास कसा आहे ? असे विचारतात तसेच समाजाचाही असाच समज आहे. तेव्हा विद्यार्थी, पालक व समाज यांचा नवीन मुल्यमापनाबद्दल गैरसमज ,चुकीची समजूत दूर करण्यासाठी या संशोधनाचे महत्व आहे. विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांचा विकास साधण्यासाठी संशोधन उपयुक्त ठरेल असे मला वाटते. व्यक्तिमत्व विकासाची

ऐतिहासिक पार्श्वभूमी विविध तत्वज्ञान , मनोविज्ञान आणि सामाजिक विचारधारांवर आधारित आहे.यामध्ये काही महत्वाचे टप्पे आणि विचारधारांचा समावेश आहे.

१. **प्राचीन तत्वज्ञान :-**

अ. **ग्रीक तत्वज्ञान : -** प्राचीन ग्रीसच्या तत्वज्ञांनी जसे की सोक्रेटीस , प्लेटो आणि अरस्तु व्यक्तिमत्वाच्या विकासावर विचार केला.त्यांनी आत्मज्ञान , नैतिकता आणि व्यक्तीच्या आचारधर्माबद्दल चर्चा केली.

ब. **बुद्ध धर्म : -** बुद्ध धर्माने आत्म – ज्ञान आणि अंतर्मुखतेला महत्व दिले , ज्यामुळे व्यक्तीच्या मानसिक विकासावर लक्ष केंद्रित केले जाते.

२. **मनोविज्ञानाचा विकास :-**

अ. **१९ व्या शतकातील मनोविज्ञान : -** सिगमंड फ्रायडने व्यक्तिमत्वाच्या संरचनेवर ( इड , इगो आणि सुपरइगो ) विचार केला. त्याच्या सिद्धांतांनी व्यक्तिमत्व विकासाच्या समजाला एक नवीन दिशा दिली.

ब. **कार्ल जंग :-** जंगने व्यक्तिमत्वाच्या विकासात व्यक्तीच्या अवचेतन मनाचे महत्व अधोरेखित केले.त्याने व्यक्तिमत्वाच्या विविध प्रकारांवर (जसे की इंट्रोव्हर्शन आणि एक्सट्रोव्हर्शन ) चर्चा केली.

३. **२० व्या शतकातील विचारधारा :-**

अ. **मानववादी मनोविज्ञान : -** अब्राहम मास्लो आणि कार्ल रॉजर्स यांसारख्या तज्ञांनी व्यक्तिमत्व विकासाला एक सकारात्मक दृष्टिकोन दिला.त्यांनी आत्म-साक्षात्कार आणि व्यक्तीच्या क्षमतांचा विकास यावर जोर दिला.

ब. **सामाजिक मनोविज्ञान : -** व्यक्तिमत्व विकासावर सामाजिक प्रभावांचा अभ्यास केला गेला.ग्रुप डायनामिक्स, सामाजिक ओळख आणि सांस्कृतिक प्रभाव यांचा समावेश यामध्ये आहे.

व्यक्तिमत्व विकासाची ही ऐतिहासिक पार्श्वभूमी व्यक्तीच्या मानसिक , सामाजिक आणि भावनिक विकासाच्या प्रक्रियेत महत्वाची भूमिका बजावते .यामुळे व्यक्ती अधिक सक्षम ,आत्मविश्वासी आणि सामाजिकदृष्ट्या समर्पित बनतात.

**व्यक्तिमत्व विकासाची सद्यस्थिती :-**

व्यक्तिमत्व विकासाची सद्यस्थिती विविध घटकांवर आधारित आहे, ज्यामध्ये तंत्रज्ञान, सामाजिक बदल आणि जागतिकीकरण यांचा समावेश आहे.खालील मुद्दे व्यक्तिमत्व विकासाच्या सद्यस्थितीचे महत्वाचे पैलू दर्शवतात.

१. **तंत्रज्ञानाचा प्रभाव :-** इंटरनेटच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकासाचे अनेक ऑनलाइन कोर्स, वेबिनार आणि कार्यशाळा उपलब्ध आहेत. यामुळे व्यक्तींना त्यांच्या कौशल्यांचा विकास करण्याची संधी मिळते.

२. **मानसिक आरोग्याची जाणीव :-** व्यक्तीमत्व विकासाच्या प्रक्रियेत मानसिक आरोग्याचे महत्त्व वाढले आहे .व्यक्ती आता त्यांच्या मानसिक आरोग्यावर अधिक लक्ष देत आहेत .ज्यामुळे आत्म-प्रतिबिंब आणि आत्म-स्वीकृतीला महत्त्व दिले जाते .

३. **व्यक्तिगत ब्रांडिंग :-**आधुनिक काळात व्यक्ती त्यांच्या व्यक्तीगत ब्रांडिंगवर लक्ष केंद्रित करत आहेत. यामध्ये त्यांच्या कौशल्यांचा, अनुभवांचा आणि मुल्यांचा प्रचार करणे समाविष्ट आहे . ज्यामुळे त्यांना करियरमध्ये प्रगती करण्यास मदत होते .

४. **सामाजिक आणि सांस्कृतिक बदल :-** विविधता आणि समावेश यावर अधिक लक्ष दिले जात आहे .व्यक्तीमत्व विकासाच्या प्रक्रियेत विविधता स्वीकारणे आणि समावेशी दृष्टिकोन महत्त्वाचा ठरला आहे .

५ . **कोचिंग आणि मार्गदर्शन :-** व्यक्तीमत्व विकासासाठी व्यावसायिक कोचिंग आणि मार्गदर्शनाची मागणी वाढली आहे.

या सर्व घटकांच्या एकत्रित प्रभावामुळे व्यक्तिमत्वाच्या विकासाची प्रक्रिया सुरु होते, ज्यामुळे व्यक्ती अधिक सक्षम , आत्मविश्वासी आणि सामाजिकदृष्ट्या समर्पित बनतात. आपणाला विद्यार्थ्यांचा बौध्दिक विकास करताना त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्व विकासासाठी शालेय जीवनात काही उपक्रम राबविणे आवश्यक आहे जेणेकरून त्यांच्या व्यक्तिमत्वात भर पडेल अशा गोष्टीचे आयोजन करावे. यासाठी शिक्षकांना विद्यार्थ्यांसाठी एका मार्गदर्शकाची भूमिका पार पाडणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची -**

1. देशमुख मंगेश, (2011 ) शिखर यशाचे, पुणे, सुरेशचंद्र पब्लिकेशन
2. जोशी व्ही.एस.(2017), व्यक्तिमत्व विकास, कोल्हापूर, उत्कर्ष पब्लिकेशन
3. करंदीकर सुरेश (1997 ), मूल्यशिक्षण, कोल्हापूर, फडके प्रकाशन
4. कुलकर्णी एस.जी. (2013), मानसशास्र आणि व्यक्तिमत्व, मुंबई, फडके प्रकाशन
5. मर्गज चंद्रकांत , (2012 ), व्यक्तिमत्व विकास, पुणे, नवनीत प्रकाशन
6. पठाण बी.बी. (2008), व्यक्तिमत्व विकास, पुणे, नित्य नूतन प्रकाशन